# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५३३ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०३/१०/२०१८

## भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यवाही

## जनावरांची अवैध वाहतुक करणारी महीन्द्रा बोलेरो पिकअप २ गाडी पकडून, ७,९५,००० रुपयाचा मुद्देमाल जप्त, ४ आरोपी अटकेत

**पोलीस ठाणे अडयाळ** : — दिनांक ०२/१०/२०१८ रोजी श्रीमती विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन अडयाळ ठाणेदार श्री. सुरेश ढोबळे पोलीस निरीक्षक व सहकारी पोलीस शिपाई मिलींद सखाराम बोरकर व सत्यराव हेमणे यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने पेट्रोलीग दरम्यान दिनांक ०३/१०/२०१८ चे ००.३० वाजता अडयाळ कडून पवनी कडे येणा—या १)महीन्द्रा पिकअप एमएच ३५/ ए. जे. ०५०८ वाहन किंमती ३,००,०००/—रु. व २)महीन्द्रा पिकअप एमएच ३५/ ए. जे. ०३९७ वाहन किंमती ३,५०,०००/—रु. दोन्ही वाहनात प्रत्येकी ४ बैल एकुण ८ बैल किंमती १,४५,०००/—रु. असा एकुण ७,९५,०००/—रु. चा माल यांचे परवानगी व पशुवैद्यकीय अधिका—यांचे प्रमाणपत्राशिवाय तसेच जनावरांचे आरोग्याबाबत व्यवस्था न करता अपु—या जागेत जनावरांना कोंबुन त्यांना त्रास होईल अश्या स्थितीत वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपींतान विरुध्द पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ११(१)(ड) प्राण्यांचा छळ.प्रति. अधी. सहकलम ९ महा. प्राणी संरक्षण कायदा सहकलम ११९ मुपोका, सहकलम ६६/१९२, ८३/१७७, ३/१८१ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

अवैध वाहतुक करतांना ट्रकमध्ये मिळुन आल्याने सर्व गोधन (जनावर) यांना त्यांचे आरोग्याची तपासनी करूण तंदरूस्तीचे दृष्टीने पिंपळगांव सडक येथील गोशाळेत ठेवण्यात आले आहेत. सदर गुन्हयात आरोपी हेमराज जगन्नाथ नंदुरकर वय २८ वर्ष, २) शिशुपाल मन्साराम मानकर वय ३६ वर्ष, ३) निलेश विठोबा वाढवे वय २२ वर्ष, तिन्ही रा. नावेझरी ता. तिरोडा, जि. गोंदिया ४) सुर्यकिरण वासुदेव उईके वय ६० वर्ष, रा. बोरगाव ता. तिरोडा जि. गोंदिया यास अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सत्यराव हेमणे पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.